!! ज्ञानदीप लावू जगी !!

Aadishakti Dhandai Mata Shikshan Prasarak Sanstha's

# Late Annasaheb R. D. Deore Arts & Science College

**Mhasadi, Tal. Sakri, Dist. Dhule (MS).**

## ACADEMIC YEAR – 2025-26



# National Service Scheme

## Annual Report-2025-26

# स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी,
# ता. साक्री, जि. धुळे
## राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक
### नियमित कार्यक्रम अहवाल
### (शैक्षणिक वर्ष 2025-26)

===========================================================

- दिनांक 20 जून 2025 रोजी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.
- दिनांक 21 जून 2025 रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा करण्यात आला.
- दिनांक 26 जून 2025 रोजी सामाजिक न्याय दिन निमित्त कार्यक्रम अधिकारी प्राबाबासाहेब .डॉ . मोताळे यांचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.
- दिनांक 26 जुलै 2025 रोजी आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या माजी अध्यक्ष आईसाहेब उषाताई देवरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिरात 62 युनिट रक्त संकलन करण्यात आले.
- दिनांक 28 जुलै 2025 रोजी 'एक पेड मा के नाम' या उपक्रमा अंतर्गत महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.
- दिनांक 9 ऑगस्ट 2025 रोजी क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- 11 ऑगस्ट 2025 रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या नामविस्तार दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.
- 10 ऑगस्ट 2025 रोजी एकदिवसीय शिबिराचे आयोजन करून महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आली.
- दिनांक 13 ते 15 ऑगस्ट 2025 यादरम्यान 'हर घर तिरंगा' हा उपक्रम राबविण्यात आला.
- दिनांक 09 ऑगस्ट 2025 रोजी रक्षाबंधन निमित्त महाविद्यालय परिसरातील वृक्षांना राखी बांधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. त्याचप्रमाणे म्हसदी येथील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना राख्या बांधण्यात आल्या.
- दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला.
- दिनांक 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2025 या दरम्यान 'स्वच्छता ही सेवा.02' अभियानांतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला.

- दिनांक 24 सप्टेंबर 2025 रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यादिवशी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.
- दिनांक 02 ऑक्टोबर 2025 रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त हा उपक्रम महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आला.
- दिनांक 15 ऑक्टोबर 2025 रोजी माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरी करण्यात आली.
- दिनांक 22 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर 2025 या कालावधीमध्ये म्हसदी येथील धनदाई देवी मंदिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी नवरात्र उत्सवात सहाय्यता केंद्र सुरू गर्दी नियंत्रण, तसेच यात्रेकरूना सूचना देऊन सहकार्य केले.
- दिनांक 31 ऑक्टोबर 2025 रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली.
- दिनांक 26 नोव्हेंबर 2025 रोजी भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.
- दिनांक 06 डिसेंबर 2025 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन अभिवादन करून स्थानिक एककातर्फे साजरा करण्यात आला.
- दिनांक 03 जानेवारी 2026 रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.
- दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी स्वामी विवेकानंद यांची जयंती 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून तसेच राजमाता जिजाऊ भोसले यांची जयंती साजरी करण्यात आली.
- दिनांक 25 जानेवारी 2026 रोजी 'राष्ट्रीय मतदार दिना'च्या निमित्ताने स्थानिक एककातील स्वयंसेवकांनी मतदारांची शपथ सामूहिकपणे घेतली.
- 30 जानेवारी 2026 रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी 'हुतात्मा दिन' म्हणून साजरी करण्यात आली.
- दिनांक 19 फेब्रुवारी 2026 रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती स्थानिक एककातर्फे साजरी करण्यात आली.

प्रा. (डॉ.) बाबासाहेब त्रिंबक मोताळे — प्रो. (डॉ.) सं. भ. गिरासे

कार्यक्रम अधिकारी रा.से.यो. — प्राचार्य

## राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक
## स्वयंसेवकांचा विविध स्तरावरील शिबिर व उपक्रमातील सहभाग
## (शैक्षणिक वर्ष 2025-26)

| अ. क्र. | स्वयंसेवकाचे नाव | शिबिर/उपक्रम | स्थळ | स्तर | दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1) कु. मिनल अण्णा बर्वे<br>2) कु. विश्वजा छगन चौधरी<br>3) कु. अंकिता भिकन जाधव<br>4) अतुल आनंदा कारंडे<br>5) योगेश जिभाऊ वाघ<br>6) पुष्पराज नितीन सोनवणे | कुलगुरू युवा प्रेरणा शिबिर2025/कुलगुरू उन्हाळी शिबिर-2025 | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | विद्यापीठ | 08 ते 14 जुलै 2025 |
| 02 | 1) अतुल आनंदा कारंडे<br>2) स्वप्निल विठ्ठल धनराळे | क्रांती दिन निमित्त विद्यापीठ स्तरीय एकदिवसीय कार्यशाळा | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | विद्यापीठ | 9 ऑगस्ट 2025 |
| 03 | कु. अंकिता भिकन जाधव | पूर्व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पतसंचलन प्रशिक्षण व निवड शिबिर | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | विद्यापीठ | 18 ते 19 सप्टेंबर 2025 |
| 04 | 1) कुअश्विनी किरण . वाघ<br>2) कुस्नेहा रतिलाल बर्वे . | राष्ट्रीय निबंध स्पर्धा | सरदार पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय मोहाडा, ता . केलापूर, जि . यवतमाळ | राष्ट्रीय | ऑक्टोबर 2025 |
| 05 | कुजान्हवी दिलीप देवरे . | माय भारत निबंध स्पर्धा | | राष्ट्रीय | ऑक्टोबर 2025 |
| 06 | अतुल आनंदा कारंडे | राष्ट्रीय एकात्मता शिबिर | कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र (हरियाणा) | राष्ट्रीय | 11 ते 17 नोव्हेंबर 2025. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 07 | कु. अंकिता भिकन जाधव | राष्ट्रीय एकात्मता शिबिर | श्री गुरु गोविंद विद्यापीठ, गोधरा (गुजरात) | राष्ट्रीय | 01 ते 07 डिसेंबर 2025 |
| 08 | प्राबाबासाहेब त्रिंबक .डॉ . मोताळे<br>(संघ व्यवस्थापक) | राष्ट्रीय एकात्मता शिबिर | श्री गुरु गोविंद विद्यापीठ, गोधरा (गुजरात) | राष्ट्रीय | 01 ते 07 डिसेंबर 2025 |
| 09 | कु. अंकिता भिकन जाधव | उत्कर्ष- सांस्कृतिक व सामाजिक महोत्सव 2025-26 | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | राज्य | 04 ते 07 जानेवारी 2026 |
| 10 | स्वप्निल विठ्ठल धनराळे | 'चान्सलर ब्रिगेड आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर' (आव्हान-2026) | पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला | राज्य | 17 ते 24 जानेवारी 2026 |
| 11 | 1) प्रशांत विजय आजगे<br>2) प्रफुल्ल ज्ञानेश्वर जाधव<br>3) प्रशिक गुलाब खरे | जिल्हास्तरीय प्रजासत्ताक दिन पतसंचलन प्रशिक्षण व निवड शिबिर | विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे | जिल्हा | 21 ते 26 जानेवारी 2026 |
| 12 | कुरिया विनोद वाघ . | प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिर | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | राज्य | 24 ते 28 फेब्रुवारी 2026 |
| 13 | कुस्नेहा . रतिलाल बर्वे<br>**कुरोशनी मुकुंदा अहिरे .**<br>कुसारिका मधुकर खरे .<br>कुपुनम हरिश्चंद्र मोहिते .<br>कुरुखमा नामदेव गायकवाड .<br>कुदिशा सुधाकर पवार .<br>कुहर्षदा छो[illegible]साळुंके .<br>कु. प्रिन्सि निलेश साळवे<br>कु. अश्विनी गुलाब खैरनार | राष्ट्रीय निबंध स्पर्धा | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे | राष्ट्रीय | जानेवारी 2026 |
| 14 | **कुरोशनी मुकुंदा अहिरे .**<br>**द्वितीय** | राष्ट्रीय निबंध स्पर्धा<br>**द्वितीय** | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे | राष्ट्रीय | जानेवारी 2026 |

**प्रा.डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे** **प्रो. सं. भ. गिरासे**
**कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.** **प्राचार्य**











INTERNAL QUALITY ASSURANCE
(IQAC)


स्व.आईसाहेब प्रा.डॉ. उषाताई रामचंद्र देवरे
यांच्या स्मृति दिनानिमित्त
रक्तदान शिबीर
२६ जुलै


रक्तदान शिबीर
२६ जुलै
vivo V29
Mhasdi Maharashtra Jul 26, 2025, 10:03


स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय,
श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि
धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळ, म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
स्व.आईसाहेब प्रा.डॉ. उषाताई रामचंद्र देवरे
यांच्या स्मृति दिनानिमित्त
२६ जुलै






क्रांती स्मारक


Department of
Chemistry




राष्ट्रीय सेवा योजना
"NOT ME BUT YOU"


स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्या
आर.डी.देवरे
विद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना


आण्णासाहेब आर.डी.देवरे
कला व विज्ञान महाविद्यालय
OPPO A9 2020 · ©SANJAY BAHIRAM
2025/09/04 08:23




धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,
आर.डी.देवरे
व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी,ता. साक्री,जि. धुळे






Department of
Chemistry


Department of
Chemistry


Department of
Chemistry


WELCOME
NSS
रक्तदान
श्रेष्ठदान




Department of Chemistry
Physical Chemistry Lab




पुरुष
प्रवेश
Mhasdi Pr.ner, Maharashtra, India
Vcp8+hgp, Mhasdi Pr.ner, Maharashtra 424304, India
Lat 20.886303° Long 74.416493°
24/09/2025 12:08 PM GMT +05:30
Google


पुरुष
प्रवेश
GPS Map Camera
Mhasdi Pr.ner, Maharashtra, India
Vcp8+hgp, Mhasdi Pr.ner, Maharashtra 424304, India
Lat 20.886318° Long 74.416636°
27/09/2025 09:48 AM GMT +05:30
Google


आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,
स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे


स्व.आणासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी


कला व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी,ता. साक्री, जि. धुळे
राष्ट्रीय सेवा योजना


tobacco causes Mouth cancer
STOP
SMOKING


STOP
SMOKING


स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी
राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभाग
भारतरत्न- डॉ. एपीजे अब्दुल कलाम जयंती
* वाचन प्रेरणा दिन *
"Education Is The Most Powerful Weapon Which You Can Use To Change The World"


To make quality affordable and accessible higher education to student in the rural and hilly area.
आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,
स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी,
ता. साक्री, जि. धुळे
(NAAC Accredited)
सेवा योजना'
NATIONAL SERVICE SCHEME
ME BUT YOU'


कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव


KURUKSHETRA UNIVERSITY KURUKSHETRA
(Established by the State Legislature Act-XII of 1956)
Grade, NAAC Accredited)
National Service Scheme
NATIONAL INTEGRATION CAMP
Theme : Youth For My Bharat and Youth
igital Literacy
November 11-17, 20
Organised by :
NSS Cell, Kurukshetra Universi
Sponsored by :
State NSS Cell, Directorate of Higher E
ana




राष्ट्रीय सेवा योजना
NOT ME BUT YOU


धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,
आण्णासाहेब आर. डी. देवरे
कला व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे
Department of Physics
Department of Chemistry


ग्रामपंचायत कार्यालय
शिव शंभु पाणीपुरी चाट सेंटर
निषेध निषेध निषेध
मालेगाव तालुक्यातील डोंगराळे
येथील सुवर्णकार समाजाची कन्या
कु. यज्ञा जगदीश दुसाने
या चिमुकली सोबत एका हारामखोराने
शारिरीक अत्याचार करून तिची
निघृण हत्या केली अशा
हारामखोराला
यज्ञा बाळाला न्याय मिळालाच पाहिजे
फाशीची शिक्षा झालीच पाहिजेल,
भावपुर्ण श्रध्दांजली
निषेध निषेध निषेध
मालेगाव तालुक्यातील डोंगराळे
येथील सुवर्णकार समाजाची कन्या
कु. यज्ञा जगदीश दुसाने
या चिमुकली सोबत एका नराधमाने
शारिरीक अत्याचार करून तिची
निघृण हत्या केली अशा
नराधमाला
निःशब्द
यज्ञा बाळा न्याय
मिळालाच पाहिजे ..!
फाशीची शिक्षा झालीच पहिजेल
शोकाकुल : आर डी देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी


'राष्ट्रीय सेवा योजना'


Government of India
Ministry of Youth Affairs & Sports
Regional Directorate of National Service Scheme, Pune
NATIONAL INTEGRATION CAMP
NATIONAL SERVICE SCHEME
Maharashtra state
KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY,
JALGAON
01st Dec. to 07th Dec. 2025
Commerce College,
Shri Govind Guru University, Godhra
सरदार


NSS Cell, Higher Education
Regional Directorate of
Shri Govind Guru U
Organized
Sardar@150
2025


कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ , जळगाव
NATIONAL INTEGRATION CAMP


Shot on OnePlus
Yog Masule




K.B.C.N.M.U.
राष्ट्रीय सेवा योजना
Mahindra 475 DI




कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
राष्ट्रीय सेवा योजना कक्ष
'उत्कर्ष'
दिनांक : ४ ते ७ जनेवारी,


आण्णासाहेब आर.डी.देवरे
कला व विज्ञान महाविद्यालय
Shot on OnePlus


राष्ट्रीय सेवा योजना कक्ष
आव्हान-२०२५-२६
जिल्हा - धुळे








कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
राष्ट्रीय सेवा योजना कक्ष
चान्सलर ब्रिगेड राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर
आव्हान-२०२५-२६
जिल्हा - धुळे
स्थळ:- डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला






कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



**लोकमत**

# गोधरा येथे राष्ट्रीय एकात्मता शिबिर

## म्हसदीच्या देवरे कॉलेजच्या अंकिता जाधवचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**म्हसदी :** आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक स्वयंसेविका अंकिता भिकन जाधव हिने नुकताच गुजरातच्या गोधरा येथे आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबिरात अत्यंत सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

श्री गुरू गोविंद विद्यापीठ, गोधरा येथे १ ते ७ डिसेंबरदरम्यान युवक व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली आणि राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय, गांधीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना अंकिताने सांस्कृतिक कला लावणी आणि आदिवासी नृत्य सादर करून उपस्थित मान्यवरांची मने जिंकली. शिबिरात ओडिशा, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थानसह आठ

**राष्ट्रीय एकात्मता शिबिरात देशातील विविध ८ राज्यातील संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.**



अंकिता जाधव हिचा गौरव करताना डॉ.संजयकुमार देवरे. सोबत राजाराम देवरे, प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे, प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील.

### युनिटी मार्चमध्ये संघाचे नेतृत्व

शिबिरातील एक महत्त्वाच्या कार्यक्रमात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित युनिटी मार्चमध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघाने देखील सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी संघाचे नेतृत्व आर.डी. देवरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी केले. अंकिता जाधव यांच्या या यशस्वी सहभागाबद्दल आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, उपाध्यक्ष राजाराम देवरे, सचिव डॉ. संजीवनी देवरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक

Hello Dhule
Page No. 2 Dec 14, 2025
Powered by: erelego.com

**पुण्य नगरी**

# अंकिता जाधवचा रासेयो राष्ट्रीय शिबिरात सहभाग



**म्हसदी :** येथील स्व. आण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककामधील स्वयंसेविका अंकिता भिकन जाधव हिने राष्ट्रीय एकात्मता शिबिरात सहभाग घेतला आहे.

गुजरात राज्यात गुरु गोविंद विद्यापीठ, गोधरा अंतर्गत वाणिज्य महाविद्यालय दभोई येथे नवी दिल्ली येथील युवक व क्रीडा मंत्रालय आणि गांधीनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय यांच्या विद्यमाने हे शिबिर झाले. यामध्ये अंकिता जाधव हिने महाराष्ट्राची सांस्कृतिक कला लावणी आणि आदिवासी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिबिरात सहभागी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या संघाचे नेतृत्व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बाबासाहेब मोताळे यांनी केले. शिबिरात ओडिशा, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, महाराष्ट्र, बिहार आणि गुजरात या आठ राज्यातील संघांनी आपापल्या राज्याचे प्रतिनिधित्व केले. अंकिता जाधव हिच्या यशस्वी सहभागाबद्दल आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, उपाध्यक्ष राजाराम देवरे, सचिव डॉ. संजीवनी देवरे, संचालक कुणाल देवरे, प्राचार्य डॉ. संजीव गिरासे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ. शिवाजी पाटील, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.डॉ. हेमंतकुमार पाटील, कार्यालय अधीक्षक अरुण पवार, प्रा.डॉ. मोताळे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे यांनी कौतूक केले.

Dhule Edition
Dec 12, 2025 Page No. 03

**सकाळ TODAY**

धुळे/नंदुरबार २०२५

# योग हा दिनचर्येचा महत्त्वाचा घटक व्हावा

## प्राचार्य गिरासे : देवरे महाविद्यालयात प्राणायाम सादर

■ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. २२ : सध्या समाजामध्ये आजारांचे जे प्रमाण वाढलेले आहे ते निव्वळ आळशीपणाचे आजार आहेत. हे जोपर्यंत लक्षात येत नाही, तोपर्यंत त्यावर मात करता येणार नाही. नियमित योग हा भारतीय संस्कृतीने सांगितलेला महत्त्वाचा सांस्कृतिक घटक आहे. परंतु, सहजपणे तिकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आजच्या आभासी व्यस्त जीवनात योग हा दिनचर्येचा महत्त्वाचा घटक व्हावा, अशी अपेक्षा प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी व्यक्त केली.



**म्हसदी :** स्व. आर. डी. देवरे महाविद्यालयात योगासने, प्राणायाम करताना प्रशिक्षक.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या (स्व.) आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक, क्रीडा विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सामूहिक योग करताना प्राचार्य डॉ. गिरासे बोलत होते. धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष यशवंतराव देवरे, छत्रपती शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष रमेश देवरे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, कार्यालय अधीक्षक अरुण पवार उपस्थित होते. क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे आणि रसायनशास्त्र विभागातील डॉ. उमेश गवई यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना विविध योगासने व प्राणायाम यांची प्रात्यक्षिके करून दाखवली. या वेळी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे, क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी संयोजन केले.

## पुण्यनगरी

# देवरे महाविद्यालय



**म्हसदी :** येथील स्व. आण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात योग दिन साजरा झाला. यावेळी प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी मार्गदर्शन केले. धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष यशवंतराव देवरे, एसएसव्हीपीएसचे अध्यक्ष रमेश देवरे, कबचौ उमवि व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, रासेयो जिल्हा समन्वयक डॉ.हेमंतकुमार पाटील, कार्यालय अधीक्षक अरुण पवार उपस्थिती होते. डॉ. जगदीश तोरवणे, डॉ.उमेश गवई यांनी योगासने सादर केली. कार्यक्रमाचे संयोजन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.मोताळे, डॉ.तोरवणे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे व स्वयंसेवकांनी केले.

Dhule Edition
Jun 24, 2025 Page No. 03

## सकाळ

# ‘देशविकासासोबतच पर्यावरण संवर्धनही महत्त्वाचे’

म्हसदी, ता. १९ : आज देश वैज्ञानिक, तंत्रज्ञानाच्या पातळीवर जोमाने प्रगतिपथावर नव्हे तर जगात अग्रक्रमावर आहे. परंतु, या जोडीला पर्यावरणाकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. पर्यावरणाची हानी झाल्यामुळे निसर्गाचा समतोल बदलत आहे. राष्ट्राचा विकास करीत असताना तेवढ्याच पद्धतीने वृक्षारोपण आणि त्यांचे संगोपन या उपक्रमालाही महत्त्वाचे स्थान असले पाहिजे, अशी अपेक्षा ग्रामपुरोहित दीपक दीक्षित यांनी व्यक्त केली.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या (स्व.) आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक यांच्यातर्फे झालेल्या वृक्षारोपणप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ.सं जीव गिरासे अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ वृक्षमित्र सुभान इमाम पिंजारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, ग्रंथपाल प्रा. डॉ. विजय जाधव, रत्नाकर जाधव उपस्थित होते. पालक शिवाजी खरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. प्राचार्य संजीव बी. गिरासे, प्रा. डॉ. शिवाजीराव पाटील आदींनी मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. विजय जाधव यांनी आभार मानले.



**म्हसदी :** देवरे महाविद्यालयात गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थानिक एककतर्फे वृक्षलागवड करताना गणू महाराज. शेजारी प्राचार्य गिरासे व प्राध्यापक.

Dhule, Dhule-Main
20/06/2025 Page No. 6

**पुण्य नगरी**

# राष्ट्र विकासासोबत पर्यावरण संवर्धन महत्वाचे

## गणू महाराज ; देवरे महाविद्यालयात वृक्षारोपण



म्हसदी : आज देश वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाच्या पातळीवर जोमाने प्रगतीपथावर नव्हे तर जगात अग्रक्रमावर आहे. परंतु याच्या जोडीला पर्यावरणाकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. पर्यावरणाची हानी झाल्यामुळे निसर्गाचा समतोल बदलत आहे. राष्ट्राचा विकास करत असताना तेवढ्याच पद्धतीने वृक्षारोपण आणि त्यांचे संगोपन करुन पर्यावण संवर्धनाला महत्त्वाचे स्थान असले पाहिजे ,असे मत गणू महाराज दीक्षित यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील गुणवत्ता हमी कक्ष आणि राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी ग्राम पुरोहित गणू महाराज बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजीव गिरासे होते. सुभान पिंजारी, कबचौ उमवि व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, ग्रंथपाल प्रा.डॉ.विजय जाधव, रत्नाकर जाधव आदींची प्रमुख उपस्थित होते. महाविद्यालयात पाल्याच्या प्रवेशावेळी उपस्थित असलेले पालक शिवाजी खरे यांच्या हस्ते देखील वृक्षारोपण करण्यात आले. सूत्रसंचलन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी तर आभार प्रा. डॉ. विजय जाधव यांनी मानले.

Dhule Edition
Jun 19, 2025 Page No. 03

**दिव्य मराठी** धुळे सिटी 31-07-2025

# पर्यावरण संतुलनासाठी वृक्षलागवड व त्यांचे संवर्धन ही राष्ट्रीय चळवळ व्हावी

### आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात डॉ.भारती देवरे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | म्हसदी

आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात निसर्गाचे संतुलन ढासळत आहे. यावर सर्वतोपरी उपाय म्हणजे मोठ्या प्रमाणावर वृक्षांचे लागवड आणि त्यांचे संवर्धन यातूनच पर्यावरणाचे संतुलन अबाधित राहू शकते. वृक्ष लागवड आणि त्यांचे संवर्धन राष्ट्रीय चळवळ व्हावी, असे मत डॉ. भारती देवरे यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात संस्थेच्या माजी अध्यक्षा स्व.आईसाहेब प्रा. डॉ. उषाताई रामचंद्र देवरे यांचा स्मृतिदिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमप्रसंगी त्या बोलत होत्या. या प्रसंगी संस्थेच्या खजिनदार डॉ. सुजाता सुनील सोनवणे, प्राचार्य डॉ. संजीव गिरासे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषीकेश चित्तम, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राध्यापक-प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

#### वृक्ष हे मानवी जीवनाचा आधारस्तंभ

याप्रसंगी प्राचार्य डॉ. संजीव गिरासे म्हणाले की वृक्ष हे फक्त निसर्ग सौंदर्य वाढवणारे नाहीत, तर जीवनाचा आधारस्तंभ आहेत. आपण सर्वांनी वृक्षांचे महत्त्व ओळखून त्यांच्या संवर्धनासाठी सक्रिय राहिले पाहिजेत. वृक्षलागवड ही एकदाच करायची गोष्ट नसून, ती नित्यनेमाची जबाबदारी मानली पाहिजे. कारण, 'झाडे लावा, झाडे जगवा' हेच भविष्यासाठी सुरक्षिततेचा मंत्र आहे.

# म्हसदी येथील देवरे महाविद्यालयात न्यायदिन उत्साहात साजरा




**दै. पोलीस शोध,**

**म्हसदी** – ब्रिटिश राजवटीत आपल्या राज्यात लोकशाही मूल्य रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी केलेले आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता या लोकशाही मूल्यांची खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात अंमलबजावणी करणारे लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते, असे मत प्रा. बाबासाहेब मोताळे यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे, स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक, विद्यार्थी विकास, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व प्राध्यापक प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. मोताळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. संजीव बी. गिरासे उपस्थित होते.

सकाळ TODAY
धुळे/नंदुरबार २०२५

# देवरे महाविद्यालयात शाहू महाराज जयंती

म्हसदी, ता. २ : येथील आदिशक्ती धनदाईमाता शिक्षण प्रसारक संस्थेचे (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक, विद्यार्थी विकासअंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व प्राध्यापक प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती कार्यक्रम झाला. त्या वेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. बाबासाहेब मोताळे यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. संजीव गिरासे अध्यक्षस्थानी होते. या वेळी प्रा. डॉ. शिवाजी पाटील, डॉ. हेमंतकुमार पाटील, डॉ. ऋषिकेश चित्तम, अरुण पवार, डॉ. विठ्ठल साळुंखे, प्रा. देवीदास भामरे उपस्थित होते. प्रा. डॉ. विजय जाधव यांनी सूत्रसंचालन केले.



**म्हसदी** : शाहू महाराज जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना प्रा. बाबासाहेब मोताळे.

**पुण्य नगरी**

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान : डॉ.सोनवणे

## देवरे महाविद्यालयात ६१ युवकांनी केले रक्तदान



**म्हसदी** : जन्माला आलेला प्रत्येक माणूस स्वतःच्या कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी जगतो. परंतु आपण समाजासाठी काहीतरी देणे लागतो. मात्र बहुतेक वेळा ही भावना लोक विसरतात. मात्र ही भावना जेव्हा मनात निर्माण होते. तेव्हा खऱ्या अर्थाने आपण जीवनात यशस्वी झालो. त्यासाठी मानवता अंगी निर्माण झाली पाहिजे. म्हणून प्रत्येकाने अन्नदानापेक्षा रक्तदान केल्याने कुणाचा तरी आपण जीव वाचवतो. म्हणुन रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, असे मत डॉ. सुजाता सोनवणे यांनी व्यक्त केले.

येथील स्व. आण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास विभाग, छत्रपती शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळ म्हसदी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी जनकल्याण रक्तकेंद्र नाशिकच्या संचालिका तथा आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ. सुजाता सोनवणे बोलत होत्या. प्राचार्य डॉ. संजीव गिरासे अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे उपाध्यक्ष आर.एम. देवरे, संचालिका डॉ.भारती देवरे, छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रमेश देवरे, प्राचार्य बी.जी. देवरे, कबचौ उमवि व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ.ऋषिकेश चित्तम, रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, जनकल्याण रक्तकेंद्राचे अरुण कुलकर्णी, निवृत्त मुख्याध्यापक भटू वाणी, प्रा.एम.डी. पाटील उपस्थित होते. यावेळी ६१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सूत्रसंचलन क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे यांनी तर आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी केले. शिबिराचे संयोजन प्रा. डॉ. मोताळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. विजय जाधव,डॉ. तोरवणे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल साळुंखे, डॉ.वनिता पवार, डॉ.हेमंत नांद्रे, डॉ.उमेश गवई यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

Dhule Edition
Jul 28, 2025 Page No. 03

**पुण्य नगरी**

# म्हसदीच्या देवरे महाविद्यालयात आज रक्तदान शिबिर

**म्हसदी** : येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय तसेच छत्रपती शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय व धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आज (दि. २६) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या माजी अध्यक्षा प्रा. डॉ.उषा देवरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिबिर होत आहे. त्याचे उद्घाटन संस्थेच्या खजिनदार डॉ. सुजाता सोनवणे, संचालिका डॉ. भारती देवरे यांच्या हस्ते होईल. आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे अध्यक्षस्थानी असतील. संस्थेच्या सचिव डॉ. संजीवनी देवरे, उपाध्यक्ष राजाराम देवरे, संचालक अभियंता कुणाल देवरे, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष रमेश देवरे, धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष यशवंत देवरे, प्राचार्य संजीव गिरासे, प्राचार्य बिपिन देवरे, कबचौ उमविच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.शिवाजी पाटील, रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम आदी उपस्थित राहतील. नाशिक येथील जनकल्याण रक्तकेंद्रामार्फत रक्त संकलन करण्यात येणार आहे. शिबिराचे संयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.बाबासाहेब मोताळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.डॉ. विजय जाधव, क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल साळुंखे, डॉ.वनिता पवार, डॉ.हेमंत नांद्रे, डॉ.उमेश गवई, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वयंसेवक करीत आहेत. उपस्थितीचे आवाहन प्राचार्य डॉ. संजीव गिरासे व संयोजकांनी केले आहे.

Dhule Edition
Jul 26, 2025 Page No. 03

लोकमत

# रक्तदान मानवतेचे महान कार्य

## सुजाता सोनवणे : देवरे महाविद्यालयात रक्तदान शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**म्हसदी :** जन्माला आलेला प्रत्येक माणूस स्वतःच्या कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी जगत असतो. परंतु समाजासाठी देणे लागतो, ही भावना जेव्हा मनात निर्माण होते, तेव्हा मानवतेच्या दृष्टिकोनातून रक्तदान करणे हे जीवनातील महान कार्य आहे, असे मत आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ. सुजाता सोनवणे यांनी उद्घाटनाच्या प्रसंगी व्यक्त केले.

आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळ म्हसदी यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव गिरासे उपस्थित होते.

दरम्यान, उपस्थित मान्यवरांनी रक्तदान शिबिर आयोजित केल्याबद्दल या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. तसेच दरवर्षी असेच सामाजिक उपक्रम राबवावे, ज्यामुळे समाजाला फायदा होईल, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.

**६१** दात्यांनी या शिबिरात रक्तदान केले.



शिबिरात सहभागी झालेले डॉ. सुजाता सोनवणे, डॉ. संजीव गिरासे, राजाराम देवरे, डॉ. भारती देवरे, रमेश देवरे, बिपिन देवरे, डॉ. शिवाजी पाटील, डॉ. ऋषिकेश चित्तम, डॉ. हेमंतकुमार पाटील, अरुण कुलकर्णी, भटू वाणी डॉ. जगदीश तोरवणे आदी.

## यशस्वीतेसाठी यांनी घेतले परिश्रम

सूत्रसंचालन क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे यांनी, तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी केले. यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. विजय जाधव, क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल साळुंखे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे, डॉ. उमेश गवई आदी स्वयंसेवकांनी केले.

**यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष राजाराम देवरे, संचालिका डॉ. भारती देवरे, अध्यक्ष रमेश देवरे, प्राचार्य बिपिन देवरे, विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, डॉ. हेमंतकुमार पाटील, जनकल्याण रक्तकेंद्राचे अरुण कुलकर्णी, भटू वाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, यावेळी उपस्थित डॉक्टरांनी रक्तदान करणे म्हणजे एक प्रकार जीवनदान आहे. त्यामुळे प्रत्येकाने रक्तदान करण्याचे आवाहन केले. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना रक्तदान करण्याचे महत्त्व शिक्षकांनी सांगितले.**

Hello Dhule
Page No. 4 Aug 01, 2025
Powered by: erelego.com

**लोकमत**

# म्हसदी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**म्हसदी :** येथील आदिशक्ती धनदाईमाता शिक्षण प्रसारक संस्थेच्या अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळ म्हसदी यांच्या संयुक्त विद्यमाने २६ जुलै रोजी संस्थेच्या माजी अध्यक्षा प्रा. डॉ. उषा रामचंद्र देवरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. शिबिराचे उद्घाटन संस्थेच्या खजिनदार डॉ. सुजाता सोनवणे आणि संचालिका डॉ. भारती शिरीष देवरे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार रामचंद्र देवरे असतील. तरी सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. संजीव गिरासे आणि सर्व आयोजकांनी केले आहे.

Hello Dhule
Page No. 4 Jul 24, 2025
Powered by: erelego.com

# देवरे महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न



**दै. पोलीस शोध, म्हसदी** - जन्माला आलेला प्रत्येक माणूस स्वतःच्या कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी जगत असतो परंतु समाजासाठी देणे लागतो, ही भावना जेव्हा मनात निर्माण होते, तेव्हा मानवतेच्या दृष्टिकोनातून रक्तदान करणे हे जीवनातील महत कार्य आहे, असे मत डॉ. सुजाता सोनवणे यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास विभाग, श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळ म्हसदी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी जनकल्याण रक्तकेंद्र, नाशिकच्या संचालिका तथा आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ. सुजाता सुनील सोनवणे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव गिरासे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष राजाराम देवरे, संचालिका डॉ. भारती देवरे, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था म्हसदीचे अध्यक्ष रमेश देवरे, श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य बिपिन देवरे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, जनकल्याण रक्तकेंद्राचे श्री अरुण कुलकर्णी आणि त्यांचे सहकारी, निवृत्त मुख्याध्यापक भटू वाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ६१ रक्तदात्यांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले. शिबिराच्या उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे यांनी, तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी केले. रक्तदान शिबिराचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. बाबासाहेब मोताळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.डॉ. विजय जाधव, क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल साळुंखे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे, डॉ. उमेश गवई, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केले.

सकाळ TODAY

धुळे/नंदुरबार २०२५

# वृक्षलागवड, संवर्धन राष्ट्रीय चळवळ व्हावी

## डॉ. भारती देवरे : देवरे महाविद्यालयात 'एक पेड माँ के नाम' उपक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. २९ : आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात निसर्गाचे संतुलन ढासळत आहे. प्रदूषण, जागतिक तापमानवाढ, पर्जन्यमानातील असमानता, जमिनीची धूप, वणवे, महापूर, दुष्काळ, अवकाळी पाऊस अशा मानवनिर्मित संकटांना सामोरे जावे लागत आहे. यावर सर्वतोपरी उपाय म्हणजे मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड, त्यांच्या संवर्धनातूनच पर्यावरणाचे संतुलन अबाधित राहू शकते. वृक्ष लागवड, संवर्धन ही राष्ट्रीय चळवळ व्हावी, असे प्रतिपादन डॉ. भारती देवरे यांनी केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षणप्रसारक संस्थेच्या (कै.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात संस्थेच्या माजी अध्यक्षा दिवंगत प्रा. डॉ. उषाताई रामचंद्र देवरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या. संस्थेच्या खजिनदार डॉ. सुजाता सुनील सोनवणे, प्राचार्य डॉ. संजीव गिरासे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील उपस्थित होते.



म्हसदी : (कै.) अण्णासाहेब आर. डी. देवरे महाविद्यालयात 'एक पेड माँ के नाम' उपक्रमास उपस्थित मान्यवर.

प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी वृक्ष हे फक्त निसर्ग सौंदर्य वाढवणारे नाहीत, तर जीवनाचा आधारस्तंभ आहेत. आपण सर्वांनी वृक्षांचे महत्त्व ओळखून त्यांच्या संवर्धनासाठी सक्रिय प्रयत्न केले पाहिजे. वृक्षलागवड ही एकदाच करायची गोष्ट नसून ती नित्यनेमाची जबाबदारी मानली पाहिजे. कारण, 'झाडे लावा, झाडे जगवा' हाच भविष्यासाठी सुरक्षिततेचा मंत्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रा. डॉ. शिवाजी पाटील यांनी पर्यावरण समतोल राखण्यासाठी सर्वांनी वृक्षारोपण केले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

वृक्ष कार्बनडायऑक्साईड शोषून प्राणवायू निर्माण करतात. जमिनीची धूप थांबवत, भूजलस्तर वाढवतात. वृक्ष हवामान नियंत्रित करतात व तापमान कमी ठेवतात. राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा विभागाअंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि विद्यार्थी विकास विभागाने संयोजन केले.

पुण्य नगरी

# पर्यावरण संतूलनासाठी वृक्षलावगड राष्ट्रीय चळवळ व्हावी!

## डॉ. भारती देवरे : 'एक पेड माँ के नाम' उपक्रम



**म्हसदी** : आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात निसर्गाचे संतूलन ढासळत आहे. प्रदूषण, जागतिक तापमानवाढ, पर्जन्यमानातील असमानता, जमिनीची धूप, महापूर, दुष्काळ, अवकाळी पाऊस अशा संकटांना सामोरे जावे लागत आहे. यावर सर्वतोपरी उपाय म्हणजे मोठ्या प्रमाणावर वृक्षांची लागवड आणि त्यांचे संवर्धन यातूनच पर्यावरणाचे संतूलन अबाधित राहू शकते. वृक्ष लागवड आणि त्यांचे संवर्धन ही राष्ट्रीय चळवळ व्हावी, असे मत डॉ. भारती देवरे यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर.डी.देवरे महाविद्यालयात संस्थेच्या माजी अध्यक्षा प्रा.डॉ. उषा देवरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम झाला. प्रसंगी त्या बोलत होत्या. संस्थेच्या खजिनदार डॉ. सुजाता सोनवणे, प्राचार्य डॉ. संजीव गिरासे, उमवि व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ.गिरासे यांनी झाडे लावा, झाडे जगवा, हेच भविष्यासाठी सुरक्षिततेचा मंत्र आहे, असे सांगितले. प्रा.डॉ. शिवाजी पाटील यांनी देखील पर्यावरण समतोल राखण्यासाठी सर्वांनी वृक्षारोपण केले पाहिजे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि विद्यार्थी विकास विभाग यांनी केले.

Dhule Edition
Aug 3, 2025 Page No. 03

पुण्य नगरी

**In Short**

## म्हसदीत तिरंगा रॅली



**म्हसदी :** येथील स्व. आर.डी. देवरे महाविद्यालयातील रासेयो स्थानिक एकक आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत तिरंगा रॅली काढण्यात आली. प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी रॅलीचा शुभारंभ केला. कबचौ उमवि व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ. शिवाजी पाटील, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.हेमंतकुमार पाटील, अधिसभा सदस्य डॉ.ऋषिकेश चित्तम, कार्यालय अधीक्षक अरुण पवार यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्त कर्मचारी, विद्यार्थी, स्वयंसेवक रॅलीत सहभागी होते. उपक्रमाचे संयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बाबासाहेब मोताळे, क्रीडा संचालक डॉ.जगदीश तोरवणे, डॉ.वनिता पवार, डॉ.हेमंत नांद्रे व स्वयंसेवकांनी केले.

## देवरे महाविद्यालयात ' हर घर तिरंगा' उपक्रम



**(दैनिक पोलीस शोध वृत्त)**

**म्हसदी –** येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. आण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'हर घर तिरंगा' उपक्रमाअंतर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन घरून समाज प्रबोधन करण्यात आले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या क्रांतिवीर यांना अभिवादनही करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. संजीव बी. गिरासे यांनी तिरंगा ध्वज दाखवून या तिरंगा रॅलीचे उद्घाटन केले. याप्रसंगी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. शिवाजी पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, कार्यालय अधीक्षक अरुण पवार, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतरकर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

पुण्य नगरी

# रासेयोतर्फे 'एक दिन, एक घंटा, एक साथ' उपक्रम



**म्हसदी :** येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे स्वच्छता हीच सेवा अभियान अंतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त 'एक दिन, एक घंटा, एक साथ' उपक्रम राबविण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.संजीव गिरासे होते तर रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.डॉ. हेमंतकुमार पाटील, प्रा.डॉ.वाल्मीक आढावे, कार्यालयीन अधीक्षक अरुण पवार, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बाबासाहेब मोताळे, सहाय्यक अधिकारी डॉ.हेमंत नांद्रे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.वनिता पवार उपस्थित होते. उपस्थितांना स्वच्छतेसाठी सामूहिक शपथ दिली. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे व स्वयंसेवकांनी केले.

Dhule Edition
Sep 28, 2025 Page No. 03

सकाळ TODAY
बातमीदार : दगाजी देवरे, म्हसदी 9850663405
धुळे/नंदुरबार २०२५

# सांस्कृतिक संवर्धनासाठी युवकांची सांघिक भूमिका महत्त्वाची

## प्राचार्य डॉ. संजीव गिरासे : देवरे महाविद्यालयात नोंदणी मोहिमेचे उद्घाटन

■ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. १२ : भारताची सांस्कृतिक परंपरा जगात अलौकिक आहे. भारतात मानवी जीवन सुकर, सांघिक भावनेने जगण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या सांस्कृतिक परंपरा आहेत. कुटुंब व्यवस्था, विवाह संस्था, सामाजिक न्याय, धार्मिक व आध्यात्मिक अधिष्ठान, सर्वधर्मसमभाव, बंधुता अशा विविध अंगी सांस्कृतिक परंपरांचे जतन करणे आज काळाची गरज ठरत आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचा वाढता प्रसार थांबवण्यासाठी समाजातील विविध पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. राष्ट्राचा विकास तथा सांस्कृतिक संवर्धन करण्यासाठी युवकांची सांघिक भूमिका महत्त्वाची ठरेल, असे मत प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातर्फे 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग : २०२६' अंतर्गत झालेल्या 'विकसित भारत क्विझ'मध्ये महाविद्यालयातील अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी सामूहिक नोंदणी मोहिमेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. गिरासे बोलत होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील, डॉ. वाल्मीक आढावे, डॉ. संदीप नांद्रे, डॉ. भाऊसाहेब काकडे, डॉ. विठ्ठल साळुंखे, डॉ. वनिता पवार, प्रा. देविदास भामरे, कार्यालय अधीक्षक अरुण पवार उपस्थित होते. प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी आयोजनामागील माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे यांनीही उपक्रमाचे कौतुक केले.

रासेयोचे धुळे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील यांच्या हस्ते 'क्यूआरकोड'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. महाविद्यालयातून पहिल्याच दिवशी ७८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. डॉ. हेमंत नांद्रे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. वनिता पवार यांनी आभार मानले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केले.



**म्हसदी :** (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग- नोंदणी' मोहिमेच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित प्राचार्य, प्राध्यापक व स्वयंसेवक.

पुणे। मुंबई। कोल्हापूर। नाशिक। छत्रपती संभाजीनगर। सोलापूर। नागपूर। सातारा। जळगाव। नांदेड। अकोला। सांगली। अहिल्यानगर येथून दररोज प्रसिद्ध

SakalNews SakalMediaNews esakal.com TOLL FREE: 9881 598 815

# सकाळ

'इंडिया' आघाडी पराभूत मानसिकतेत

पान ॥



दहशतवादी कोठेही सुरक्षित नाहीत

पान ६



धुळे, बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५ • आर.एन.आय. MAHMAR/२०११/७७४३० किंमत ₹ ५ आजचा अंक : धुळे, नंदुरबार जिल्हा : पाने १६ (१२+४)

# तंबाखूपासून दूर राहण्यासाठी जागृती करावी

## प्राचार्य संजीव गिरासे यांचे प्रतिपादन; म्हसदीत अभियान

■ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. १४ : तंबाखूच्या सेवनापासून दूर राहण्यासाठी तसेच, आपले कुटुंबीय, शेजारी आणि समाजातील इतरांना तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जागृत करण्यासाठी प्रत्येकाने पुढे यावे. तंबाखू किंवा आदर्श जीवन या दोन्हीपैकी एकाची निवड करावी, असे आवाहन प्राचार्य संजीव गिरासे यांनी केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या (कै.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने 'तंबाखुमुक्त युवा अभियान ३.०' आयोजित करण्यात आले. येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. राधा सोनार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

पंचायत समितीचे माजी सदस्य राजधर देसले, परिवहन महामंडळाचे निवृत्त कर्मचारी राजेंद्र देवरे, दिलीप मंडलिक, शिवाजी माध्यमिक विद्यालयाचे निवृत्त कर्मचारी आर. एम. देवरे ,भटू वाणी, योगेश हिरे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. संजीव गिरासे अध्यक्षस्थानी होते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी प्रास्ताविक केले. तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाच्या दुष्परिणामांविषयी माहिती देत तंबाखू, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन कोणीही करणार नाही, यासंदर्भात सामूहिक प्रतिज्ञा दिली. वैद्यकीय अधिकारी डॉ. राधा सोनार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी माहिती दिली. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी सूत्रसंचालन केले. सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार यांनी आभार मानले. प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे, समन्वयक डॉ. विजय जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.




**म्हसदी :** येथील (कै.) अण्णासाहेब आर. डी. देवरे महाविद्यालयात व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ घेताना मान्यवर व विद्यार्थी.

### रांगोळीतून जनजागृती

■ तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करणारी रांगोळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका जागृती ठाकरे, मेघना अहिरे, शीतल गायकवाड, गायत्री भदाणे, पूनम मोहिते, दिव्या अहिरे, रुखमा गायकवाड यांनी तयार केली. रांगोळीचे निरीक्षण करून स्वयंसेविकांचे कौतुक केले. तंबाखूजन्य पदार्थ सेवनविरोधी जनजागर करणारी पुणे येथील सेवाभावी संस्था स्पेस यांच्यातर्फे व्हिडिओ दाखविण्यात आला. या व्हिडिओतून व्यसनातून होणारे निरनिराळे आजार, व्याधी यासंबंधीचे प्रबोधन करण्यात आले.

**पुण्य नगरी**

# जीवनातील नैराश्यावर ग्रंथवाचन हा उत्तम पर्याय



## प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांचे मत

**म्हसदी** : ग्रंथ वाचनातून व्यक्तीचे विचार सकारात्मक व समृध्द होतात. या प्रक्रियेमुळे समाजमान्य व आदर्श व्यक्तिमत्व घडत असते. शिवाय वाचन व्यासंगातून जीवनात येणाऱ्या प्रत्येक संकटांना धीराने सामोरे जाता येते. त्यामुळे जीवनात आलेल्या नैराश्यावर ग्रंथ वाचन हा उत्तम पर्याय आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक आणि ग्रंथालयशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य तथा उपप्राचार्य प्रा. डॉ.शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ.ऋषिकेश चित्तम, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.हेमंतकुमार पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी केले तर आभार ग्रंथपाल प्रा.डॉ. विजय जाधव यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्रा.डॉ. बाबासाहेब मोताळे, ग्रंथपाल प्रा.डॉ. विजय जाधव, डॉ. वनिता पवार, डॉ.हेमंत नांद्रे, डॉ. रमेश अहिरे, कार्यालय अधीक्षक अरुण पवार, बापु मोहिते व स्वयंसेवकांनी केले.

Dhule Edition
Oct 17, 2025 Page No. 02

दिव्य मराठी धुळे 17-11-2025


सत्य सांगू, बिनधास्त
**दिव्य मराठी**
आज नो निगेटिव्ह वृत्तपत्र
जळगाव.महाराष्ट्र | सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ | १२ राज्ये | ६१ आवृत्त्या


आजच्या दिवशी
**बाळासाहेब ठाकरे यांचे निधन**
2012. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे मुंबईत निधन झाले. त्यांनी कधीही कोणती निवडणूक लढवली नाही, पण ते नेहमी किंगमेकरच्या भूमिकेत राहिले.

# म्हसदीला आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांना केले अभिवादन

**प्रतिनिधी | म्हसदी**

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्थानिक एकक आणि विद्यार्थी विकास विभागातर्फे क्रांतिवीर, जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला.



जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करताना उपस्थित मान्यवर.

जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य संजीव गिरासे यांनी बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली. बिरसा मुंडा यांनी ब्रिटिशांकडून आदिवासींवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात गुलउलान आंदोलन उभे केले होते. भारतीय संस्कृतीचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी बिरसा मुंडा यांनी आजीवन प्रयत्न केल्याचे प्राचार्य गिरासे यांनी सांगितले. भगवान बिरसा मुंडा यांची जयंती जनजाती गौरव दिन म्हणून साजरा करण्याचे केंद्र शासनाने घोषित केले असल्याची माहिती देण्यात आली. या वेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. ऋषीकेश चित्तम, डॉ. जहागीरदार साळुंखे, प्रवीण मोरे, संजय बहिरम, राजेंद्र देवरे, रत्नाकर जाधव, बापू मोहिते, रामदास शेवाळे आदी उपस्थित होते.

# देवरे महाविद्यालयात 'हमारा संविधान-हमारा स्वाभिमान' उपक्रम



**(दैनिक पोलीस शोध)**

**म्हसदी:**-येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. आण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय 'संविधान दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी 'हमारा संविधान-हमारा स्वाभिमान' या उपक्रमांतर्गत भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे तसेच भारतीय संविधानातील विविध तत्वांचे भारतीय नागरिक म्हणून जतन करण्यासाठी कटिबद्ध राहण्याची शपथ यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी घेतली. संविधान दिन प्रसंगी भारतीय संविधान आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ. शिवाजी पाटील, डॉ. किशोर सोनावणे, प्रा. डॉ. विजय जाधव,प्रा. देविदास भामरे, प्रा. सिद्धार्थ ईखारे, भैय्यासाहेब देवरे, राजेंद्र देवरे रत्नाकर जाधव, जितेंद्र देवरे, बापू मोहिते, रामदास शेवाळे उपस्थित होते. यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. भारतीय संविधानाच्या सामूहिक वाचनामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

# देवरे महाविद्यालयात जागतिक एड्स दिन, गीता जयंती साजरी



**(दैनिक पोलीस शोध)**

**म्हसदी** - शेतकरी शेतमालाच्या उत्पादन वाढीसाठी वेगवेगळ्या पद्धतीचे रासायनिक खते, फवारणीचे औषधे वापरल्यामुळे शेती उत्पादनात प्रचंड वाढ झाली. परंतु शेतमालाची गुणवत्ता ढासळली. जागतिक बाजारपेठेमध्ये फक्त सेंद्रिय उत्पादन स्वीकारले जाते.

भारतीय शेतकरी उत्पादन वाढीसाठी मोठ्या प्रमाणावर कीटकनाशक फवारणी व रासायनिक खतांचा भरमसाठ वापर केल्यामुळे शेतमालाची गुणवत्ता ढासळलेली आहे. अशा शेतमालाला जागतिक बाजारपेठेत स्वीकारले जात नाही. जागतिक बाजारपेठ शेतमालाला उपलब्ध न झाल्यामुळे शेती व्यवसाय धोक्यात आलेला आहे, असे मत डॉ.अर्जुन तोरवणे यांनी व्यक्त केले.येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातर्फे 'जागतिक एड्स दिन' व गीता जयंती निमित्त श्रीमद् भगवदगीता ग्रंथाचे पूजन प्रसंगी इंजिनियर डॉ. अर्जुन मोतीराम तोरवणे बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. संजीव बी. गिरासे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक प्रा.डॉ. हेमंतकुमार पाटील, कार्यालय अधीक्षक अरुण पवार आदी मान्यवर उपस्थित होते. जागतिक एड्स दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी एड्स संदर्भात रांगोळी काढून जनजागृती केली.

भारतीय संस्कृतीमध्येएकपत्नी व्रत हे मूल्य असल्यामुळे भारतातील नागरिकांना एड्स हा आजार होऊ शकत नाही, परंतु अलीकडच्या काळामध्ये पाश्चात्य अनुकरणातून भारतीय संस्कृतीची मूल्य पायदळी तुडवली गेल्यामुळे एड्स सारख्या भयानक आजाराला सामोरे जावे लागत आहे, असे मत प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी व्यक्त करीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना एड्सची कारणे व उपाय या संदर्भात जनजागृती पर माहिती दिली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केले.

सकाळ TODAY

बातमीदार : दगाजी देवरे, म्हसदी 9850663405

धुळे/नंदुरबार २०२५

# चाळण झालेल्या बेहेड– साक्री रस्त्याची दुरुस्ती

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांकडून श्रमदान



**बेहेड** : चाळण झालेल्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी श्रमदान करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक.

■ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. ३० : येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातील स्वयंसेवक आणि क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी बेहेड- नांदवन- साक्री या रस्ता दुरुस्ती व डागडुजी करण्यासाठी उत्स्फूर्तपणे श्रमदान केले.

सोळगाव- काटवान परिसरातील मित्रांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने श्रमदान केले. बेहेड- नांदवन- साक्री या चाळण झालेल्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी वेळोवेळी शासनाकडे तक्रारी करूनही प्रतिसाद न मिळाल्यामुळे काटवान परिसर मित्र मंडळाने परिसरातील तरुणांना श्रमदान करण्याची हाक दिली. त्यात महाविद्यालयातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी दिवसभर श्रमदान करून सामाजिक बांधिलकी जपली. श्रमदान कार्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, सचिव डॉ. संजीवनी देवरे, संचालक इंजि. कुणाल देवरे आदींनी प्रोत्साहन दिले. क्रीडा संचालक प्रा. डॉ. जगदीश तोरवणे, स्वयंसेवक अतुल कारंडे, जय तोरवणे, स्वप्निल धनराळे, अविनाश पवार, रत्नराज वाघ, विशाल देवरे, प्रमोद माळीच, योगेश कारंडे आदींनी श्रमदान केले. श्रमदान केलेल्या सर्वांना २६ जानेवारीला 'काटवान मित्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

रासेयोचे स्वयंसेवक, क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांना प्राचार्य संजीव गिरासे आणि क्रीडा संचालक प्रा. डॉ.जगदीश तोरवणे यांनी मार्गदर्शन केले. स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकी जपत उत्स्फूर्तपणे श्रमदान केल्यामुळे आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, उपाध्यक्ष राजाराम देवरे, सचिव डॉ. संजीवनी देवरे, खजिनदार डॉ. सुजाता सोनवणे, संचालक इंजि. कुणाल देवरे, संस्थेचे सर्व संचालक, प्राचार्य गिरासे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील, कार्यालय अधीक्षक अरुण पवार, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

पुण्य नगरी

# रस्ता दुरुस्तीसाठी विद्यार्थ्यांनी केले श्रमदान



**म्हसदी** : येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातील स्वयंसेवक व क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी बेहेड-नांदवन-साक्री या रस्त्याची दुरुस्ती व डागडुजी करण्यासाठी उत्स्फूर्तपणे श्रमदान केले. काटवान परिसरातील मित्रांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. श्रमदान कार्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, सचिव डॉ.संजीवनी देवरे, संचालक अभियंता कुणाल देवरे आदींनी प्रोत्साहन दिले. क्रीडा संचालक प्रा.डॉ.जगदीश तोरवणे, स्वयंसेवक अतुल कारंडे, जय तोरवणे, स्वप्निल धनराळे, अविनाश पवार, रत्नराज वाघ, विशाल देवरे, प्रमोद माळीच, योगेश कारंडे आदींनी श्रमदान करून योगदान दिले. त्यामुळे श्रमदान केलेल्या स्वयंसेवकांना 'काटवान मित्र' पुरस्काराने २६ जानेवारी रोजी सन्मानित करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. संजीव गिरासे, क्रीडा संचालक प्रा.डॉ. जगदीश तोरवणे यांनी मार्गदर्शन केले.

Dhule Edition
Jan 2, 2026 Page No. 03

पुण्य नगरी

# देवरे महाविद्यालयात महिलांचा केला सन्मान



**म्हसदी :** येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. आण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककामार्फत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून साजरी करण्यात आली. प्राचार्य संजीव गिरासे, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.डॉ.शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ.ऋषिकेश चित्तम, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.हेमंतकुमार पाटील, कार्यालय अधीक्षक अरुण पवार आदी उपस्थित होते. प्राचार्य गिरासे यांनी डॉ.वनिता पवार, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका जान्हवी देवरे, विश्वजा चौधरी, दीपाली लाड, राजश्री देवरे, करिष्मा नेरकर, योगिता देसले यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.वनिता पवार आणि स्वयंसेवकांनी केले.

Dhule Edition
Jan 5, 2026 Page No. 02

Instagram
Your story

nssrdpune January 6

पुण्य नगरी

# रस्ता दुरुस्तीसाठी विद्यार्थ्यांनी केले श्रमदान



**म्हसदी :** येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातील स्वयंसेवक व क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी बेहेड-नांदवन-साक्री या रस्त्याची दुरुस्ती व डागडुजी करण्यासाठी उत्स्फूर्तपणे श्रमदान केले. काटवान परिसरातील मित्रांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. श्रमदान कार्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, सचिव डॉ.संजीवनी देवरे, संचालक अभियंता कुणाल देवरे आदींनी प्रोत्साहन दिले. क्रीडा संचालक प्रा.डॉ.जगदीश तोरवणे, स्वयंसेवक अतुल कारंडे, जय तोरवणे, स्वप्निल धनराळे, अविनाश पवार, रत्नराज वाघ, विशाल देवरे, प्रमोद माळीच, योगेश कारंडे आदींनी श्रमदान करून योगदान दिले. त्यामुळे श्रमदान केलेल्या स्वयंसेवकांना 'काटवान मित्र' पुरस्काराने २६ जानेवारी रोजी सन्मानित करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. संजीव गिरासे, क्रीडा संचालक प्रा.डॉ. जगदीश तोरवणे यांनी मार्गदर्शन केले.


Congratulations! You've Qualifie
MY Bharat
mail.google.com/mail/u/0/#inbox/FMfcgzQcqHTvRfdmwGlHXgsRCnmcxQSM
To get future Google Chrome updates, you'll need Windows 10 or later. This computer is using Windows 7.
Learn more
This browser version is no longer supported. Please upgrade to a supported browser.
Learn More
Gmail
Search mail
Compose
Inbox 28
Starred
Snoozed
Sent
Drafts 3
Purchases
More
Labels
Upgrade
5 of 55
Congratulations! You've Qualified for the Essay Round of the CAG National Online Essay Competition 2025
Inbox
support@mybharat.gov.in
to me
Oct 10, 2025, 10:00 AM (5 days ago)
Congratulations! You've Qualified for the Essay Round of the CAG National Online Essay Competition 2025
Dear Participant,
Congratulations! You have successfully qualified for the Essay Round of the National Online Essay Writing Competition 2025, organized by the Office of the Comptroller and Auditor General (CAG) of India and hosted on the MY Bharat Portal.


11:57
50%
NSS Maharashtra
NSS Maharashtra is with Ministry of Youth Affairs and Sports, Government of India and 5 others.
29m ·
*16th National Voters Day Celebration - My India My Vote pledge by NSS unit of RD Deore Arts & Sci Mahavidyalaya Mhasadi Dhule*
#NVD2026
#myindiamyvote
#NSSVolunteers
#NotMeButYou
#nssfordemocracy
Comment as Babasaheb Motale

सकाळ TODAY
बातमीदार : दगाजी देवरे, म्हसदी 9850663405

# देवरे महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन

**म्हसदी :** येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या (स्व.) आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. यावेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम व कार्यालय अधीक्षक अरुण पवार उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी स्वयंसेवकांना राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्त्व सांगून मतदारांसाठी सामूहिक प्रतिज्ञा दिली. कार्यक्रमाच्या संयोजनासाठी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे, क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे, डॉ. हेमंत नांद्रे, डॉ. वनिता पवार व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

दिव्य मराठी धुळे सिटी 24-01-2026

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त घेतली सामूहिक प्रतिज्ञा

**म्हसदी** | येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर.डी. देवरे महाविद्यालयातील रासेयो एकक आणि राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला.

यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, कार्यालय अधीक्षक अरुण पवार यांची उपस्थिती होती. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी स्वयंसेवकांना राष्ट्रीय मतदार दिनाविषयी माहिती देत मतदारांसाठीच्या सामूहिक प्रतिज्ञाचे वाचन केले.

मतदारांसाठीच्या या सामूहिक प्रतिज्ञेवेळी साहस कार्यशाळेसाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व विद्यार्थी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. प्रा.डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. जगदीश तोरवणे, डॉ. हेमंत नांद्रे, डॉ. वनिता पवार यांनी केले.

**पुण्य नगरी**

## रोशनी अहिरे राष्ट्रीय निबंध स्पर्धेत द्वितीय



**म्हसदी** : येथील स्व.आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेविका आणि द्वितीय वर्ष विज्ञान वर्गातील विद्याद्यार्थिनी रोशनी मुकुंदा अहिरे हिने राष्ट्रीय निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त म.गांधी तत्त्वज्ञान केंद्रातर्फे ही स्पर्धा घेण्यात आली. यात रोशनी अहिरे हिने भारतीय संविधान काल, आज आणि उद्या या विषयावर निबंध लेखन केले होते. रोशनी बल्हाणे (ता.साक्री) येथील शेतकरी मुकुंदा अहिरे यांची कन्या आहे. तिला रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बाबासाहेब मोताळे, प्रा.डॉ. हेमंतकुमार पाटील, प्रा.डॉ.वाल्मिक आढावे, डॉ.मिलिंद देवरे, डॉ.वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल तिचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, उपाध्यक्ष राजाराम देवरे, सचिव डॉ. संजीवनी देवरे, संचालक इंजि. कुणाल देवरे, प्राचार्य प्रा.संजीव गिरासे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ. शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, कार्यालय अधीक्षक अरुण पवार यांनी कौतूक केले.

**दिव्य मराठी** धुळे सिटी 28-02-2026

## म्हसदी येथील देवरे महाविद्यालयाची रोशनी अहिरे राष्ट्रीय निबंध स्पर्धेत द्वितीय

**म्हसदी** | येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेविका आणि द्वितीय वर्ष विज्ञान वर्गातील विद्यार्थिनी रोशनी मुकुंदा अहिरे हिने राष्ट्रीय निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. विद्यापीठाच्या महात्मा गांधी तत्त्वज्ञान केंद्रातर्फे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. रोशनी अहिरे हिने 'भारतीय संविधान काल, आज आणि उद्या' या विषयावर निबंध लेखन केले होते. या राष्ट्रीय निबंध स्पर्धेसाठी देशभरातून ४५० पेक्षा अधिक निबंध सादर केले होते. रोशनीच्या यशाबद्दल कौतुक होत आहे.

